ावूं दे " तेव्हां ती दूर झाली आणि बाबा, जमालबाई आणि लक्ष्मीबाई असे तिघेजण भरभर जातें चालवून तें गहूं हां हां म्हणतां घंटाभरानें दळले.

दळण झाल्यावर तें पीठ चाळून पाखडून त्याची मळणी होऊन बाबा स्वत: भाकऱ्या लाटावयास बसले. बाबा किती तरी मोठ्या आकाराच्या भाकरी स्वत: लाटीत आणि भाजीत असत हें आम्ही सर्व कौतुकानें पाहात होता.

आतां भुतेंखेतें वगैरेंच्या अस्तित्वाविषयीं दुसऱ्या एखाद्या लेखात विचार होईल. येथें इतकें मात्र नमूद करतों कीं, कित्येकांप्रमाणें माझ्या मित्राच्या बायकोलाही दृष्टि होती. आम्ही बहुधा याविषयीं डोळ्यांचा विकार असावा अशा साशंक वृत्तीनें विचार करीत असूं; पण बाबांनीं त्याविषयीं स्पष्ट बोलून बाईच्या अनुभवाच्या सत्यतेविषयीं आमची खात्री करून आमचें समाधान केलें.

आणखी दुसरीही गोष्ट अत्यंत विचार करण्यासारखी आहे. ती ही कीं, श्रीसांईबाबांचें आश्वासन कीं, "भुतेंखेतें आपल्या वाटेस जावयाचीं नाहींत."

श्री सांईबाबांचा अधिकार विश्वव्यापी होता. झपाटलेलीं माणसें यांच्याजवळ येत असत आणि ते त्यांना बरें करीत असत, हें पुष्कळांनीं पाहिलेलें आहे. अशा पूर्ण स्वामित्वाच्या अधिकारी पुरुषाला शरण जाऊन यांचा वरदहस्त आपल्या माथ्यावर असून अथवा तितकीच आश्चर्यकारक पूर्ण अधिकारयुक्त अशी त्यांची उदी जवळ असल्यावर या क्षुद्र योनींचें कांहींही चालणार नाहीं हें आश्वासन लहानसहान आहे काय?

श्रीकृष्ण परमात्मा श्री गीतेंत तरी हेंच शिकवीत आले नाहीं काय कीं, जरी मी सर्व दैवतांत आहे तरी त्या क्षुद्र दैवतांना बाजूस ठेवून मला एकट्यालाच त्वां भजावें, शरण जावें, मग तुझी चिंता मलाच सर्वतोपरीनें केलीच पाहिजे.

श्री साईलीलेचें अस्तित्व तरी याचसाठीं नाहीं काय? प्रत्येकाला श्री भगवान् आपल्या पाशीं आहे, असा आत्मविश्वास अनुभवयुक्त उत्पन्न

होऊन त्याचें जीवित हीनदीन वृत्तिविरहित होऊन त्याच्या हातून धडाडीचीं कार्यें व्हावींत ही श्रीसाईबाबांच्या लीला अवलोकन करून अथवा अनेक स्त्रीपुरुषांच्या लेखणींतून त्यांचे प्रत्यक्ष अनुभव वाचून ते पचवून अभी युक्त होण्यासाठीं नव्हे काय ?

श्रीसाईबाबांनीं मुख्यत्वेंकरून आपल्या दक्षिणी मंडळीसारख्या चिकित्सक व अश्रद्धाळू जनांना रस्ता दाखविण्यासाठींच शिर्डीस वास्तव केलें हें उघड आहे.

श्री माणिक प्रभूप्रमाणें तसेंच श्री अक्कलकोटच्या स्वामी महाराजा प्रमाणें श्रीसाईबाबांचें अस्तित्व व लीला हिंदु, मुसलमान, पार्शी, खिस्ती या सर्वांना एके ठिकाणीं आणून वृथा गोलंकार न करतां सर्वांचा रस्ता एक आहे ही जाणीव देण्यासाठीं नव्हतें काय ?

असो. वर लिहिलेला दळणकांडणादि प्रकार पाहून स्वाभाविकरीत्या विचार सुचतो कीं, श्रीसाई बाबांसारख्या दिव्य परिपूर्ण पुरुषानें ही गोष्ट कां करावी ! त्यांना या जगांत काय करावयाचें बाकी राहिलें होतें ? कीं त्यांनीं स्वतः गहूं दळून त्याचें पीठ करून तें चाळून पाखडून मळून त्याच्या भाकऱ्या लाटून भाजून त्या बाळगोपाळांना त्यांनीं खाऊ घालाव्या. ?

आतां भुतांखेतांसाठीं पारमार्थिकदृष्ट्या त्यांच्या पुढच्या भाकरीच्या तुकड्यांतून ते हमेशा कांहीं घास बाजूला ठेवीत असत. आपणांतील भाविक जन जेवणापूर्वी पांच घास बाजूला ठेवून नंतर चित्रावळ वाढून अन्नाला प्रणाम करून नंतर भोजन सुरू करितात. निराकार प्रभूला आळविणारे, समोर आलेलें अन्न देवाला अर्पण करून नंतर ते त्याचा प्रसाद म्हणून सेवित नाहीं काय ?

पाश्चात्यांमध्यें गेल्या पंचवीस तीस वर्षांपूर्वी ग्रेस म्हणजे प्रभूचे आभार मानून नंतर अन्न ग्रहण करण्याचा रिवाज होता. मागल्या लेखांत लिहिल्याप्रमाणें आजमितीस देवावरचा त्यांचा विश्वास ढिसले-

दिवस क्षीण होत चाल्यामुळें, हा ग्रेस म्हणण्याचा प्रघात नाहींसा होत आहे. आणि आम्ही त्यांचें क्षुद्र अनुकरण करून हॉटेलांत जाऊन खाव-ग्रास शिकल्यामुळें हा प्रघात आपणामध्यें झपाट्यानें शिरत आहे. हें असें व्हावें हें आपल्यासारख्या प्रभुप्रेमी मनुष्यांना इष्ट आहे काय ?

" त्यांत काय आहे ? न केलें तर कोठें नडतें !" असेंही बोलणारे पदोपदीं आढळतात. परंतु जरा विचार करावा. साधें व सुग्रास अन्न आपल्यापुढें देवाच्या दयेनें वाढण्यांत येत आहे. आज किती तरी श्रीनारायणाच्या रूपांना दारिद्र्यानें गांजल्यामुळें या आपल्या पुढल्या अन्नाचा किंचित्‌ही भाग त्यांच्या दृष्टीस पडत नाहीं. रात्रंदिवस स्वतःच्या व बापड्या पोराबाळांच्या अर्धपोटीं, कृश व वाळलेल्या शरीरांकडे पाहून त्यांना काय दुःख होत असेल याचा क्षणभर तरी विचार करून, त्यांना अन्न मिळावें अशी प्रार्थना करून एक घांस त्यांच्याप्रीत्यर्थ बाजूस काढून ठेवल्यास सर्वसाक्षी, सर्वव्यापी, सर्वशक्तिमान् अंतर्बाह्य भगवान् या आपल्या इच्छेनुसार आपणांला तसेंच या दरिद्रीनारायणांना दुःखमुक्त होण्याचा मार्ग दाखवील यांत शंका आहे काय ?

या अर्धपोटीं राहाणाऱ्या दीनदरिद्री नारायणांचें कल्याण कसें होईल याविषयीं कायिक, वाचिक, आणि मानसिक तपश्चर्या वर्षेंच्या वर्षें करून आज महात्मा गांधी यांनीं जनतेंत जें चलन आणि जागृति उत्पन्न केली आहे त्याचा विचार जरूर करावा. त्यासाठीं ते अर्धपोटीं राहिले व वस्त्रहीन झाले. स्वतः उपासतापास करून शरीरास कष्ट देऊन आठवड्यांतून एक दिवस निखालस मौन राहून शारीरिक, बौद्धिक आणि आत्मिक सामर्थ्य त्यांनीं प्राप्त करून घेतलें कीं, ज्याचा प्रभाव आज आपण आपल्या डोळ्यांनीं प्रत्यक्ष पाहात आहोंत.

या गोष्टी आकस्मित घडून येत नाहींत. यांत कांहीं तरी निखालस विशेष गुह्य आहे. ज्यांनीं श्रीसाई बाबांना स्वतः दळून, कांडून, आकण्या

करून त्या गोरगरीबांना व इतरांना खावविताना पाहिलें आहे त्यांना य गुह्याचा मतितार्थ सहज कळून यावा.

या उपरांत श्रीसाईबाबांच्या दळणकांडणादि क्रियांत दुसराही निष्कर्ष निघतो. तो हा कीं पाश्चात्यांच्या केवळ डोळे दिपविणाऱ्या खोट्या दिखाऊपणाकडे दृष्टि वळवितां कामाची नाहीं हें.

श्री सांईबाबांनीं लो. टिळक, खापर्डे वगैरे त्या वेळच्या सर्व पुढारी, ठळक व प्रसिद्ध अशा विद्वान, शास्त्री, पंडित, डॉक्टर, वैद्य, इन्जीनिअर्स, कलेक्टर, मामलेदार, सरदार, जहागिरदार, राजे, राण्या, यांना आपल्या पायापाशीं आणून कृतकृत्य केलें. आणि या सर्वांना, संसारी स्त्रीपुरुषांना उचित अशी अत्यंत साधी राहणी कशी असावी, याचें प्रत्यक्ष वर्तन करून दाखविलें याचें काय कारण असावें बरें ?

पाश्चात्यांच्या संसर्गामुळें आपण साध्या राहणीपासून दूर होत चाललों आहोंत, आणि त्यामुळें आपण आपल्या नैसर्गिक उपयुक्त कलांना फारकत देऊन कृत्रिम राहणी अंगीकृत करीत आहोंत. जी कृत्रिम राहणी आपणाला जरूर तोंडघशीं पाडील.

शहरांतून राहाणाऱ्या कितीतरी कुटुंबांना आपल्या उपयुक्त कलांची लाज वाटून पाश्चात्यांप्रमाणें खाणावळींतून डबे मागवून खाण्याची चटक लागली आहे पाहा ! यदाकदाचित् निरुपायामुळें तसें करण्याचा प्रसंग आला तर ती गोष्ट निराळी. परंतु तसें कांहीं कारण नसतां केवळ बेगडी स्वेच्छाचारासाठीं, 'वेळ नाहीं,' ही सबब पुढें करून खाणावळींतल्या अन्नावर भागवीत असतात !

अन्नच तें, तें बिचारें आपलें काम करितें. पण घरचें प्रेमपूर्वक तयार झालेलें अन्न आणि बाजारी अन्न, यांत जमीनअस्मानाचा फरक आहे हें कोणीही सुज्ञ गृहस्थ व गृहिणी कबूल करतील.

घरांत लहान मूल आहे, आणि त्याला बाटलींतून वर दूध देणें भाग पडलें आहे, तर त्या मुलाची माता दुधाची बाटली व तिचीं रबरी बोंडें किती तरी काळजीनें साफ करून, दूध योग्य रीतीनें गरम करून नंतर बाळास पाजीत असते! तीच जर निष्काळजीपणानें वेळ नाहीं ही सबब पुढें करून, हें काम मोलकरणीवर सुप्रत करील, तर त्याचा परिणाम त्या बालकाच्या प्रकृतीवर होऊन, अमांशासारखे रोग जडून त्या बालकाचे हाल, डॉक्टरचीं बिलें, जागरणें, आणि त्यापासून सर्वांच्या प्रकृतींना अस्वस्थता, आणि पुष्कळ वेळां तें बालक अकालीं मृत्युमुखीं पडणें, हे प्रकार आपण नित्यशः पाहात नाहीं काय?

त्याचप्रमाणें दुकानांतलें अन्न केवळ नफा मिळविण्याच्या हेतूनें बनविलेलें असल्यामुळें त्याच्या शुद्धाशुद्धतेविषयीं दुकानदार बहुशः बेफिकीर असतो. विशिष्ट तऱ्हेचे मसाले घालून त्या अन्नांतले दोष कळूं नयेत या हेतूनें तें खपविण्याचा तो यत्न करीत असतो. असें कृत्रिम अन्न बाधल्याशिवाय राहील काय? कृत्रिम रीतीनें गोठविलेलें डब्यांतलें दूध, बिस्किटें, मासे, वगैरे पदार्थ सेवन करून Toxine Poisoning प्राणघातक झालेले आपण पाहात नाहीं काय? चॉकोलेटच्या वडया मोठ्या हौसेनें मुलांना देण्याचा व स्वतः खाण्याचा प्रघात अलीकडे बळावला नाहीं काय? पण चॉकोलेटची वडी फोडून त्यांत असलेल्या सूक्ष्म जंतूंकडे आणि त्या जंतूंच्या विष्टेकडे कोण पाहातो? बाह्य भपक्याला भुलून जुनाट असलेली घाणेरडी Toffee म्हणजे चिकी अवाढव्य किंमतीला आपण खरीद करीत असतों. जी वस्तु घरीं थोडया वेळांत दोन पैशांत सहज आणि उत्तम होऊं शकते!

कुल्पी मलई ही वस्तु शहरांतून बरोबरीं रात्रीच्या वेळीं खरीद करण्याची जणूं काय एक जन्मसिद्ध गोष्ट झाली आहे. पण ही वस्तु किती घाणेरडया जागीं बनविण्यांत येत असते हें कोणी पाहिलें आहे काय?

सारांश, अशा तऱ्हेचें दूषित बाजारी अन्न खाण्यांत आल्यामुळें जंत, अपचन, अमांश, आणि टायफॉइड या रोगांना शहरांतून कायमचें स्थान मिळालें आहे, आणि त्यामुळें दिवसेंदिवस शहरांतून राहाणाऱ्या स्त्रीपुरुषांची शरीरें रोगग्रस्त आणि निःसत्व होत चाललीं आहेत. पचनक्रिया क्षीण झाल्यामुळें तिला ऊर्जित करण्यासाठीं ब्रॅंडी, व्हिस्की वगैरे भयंकर मदिरारूपी जहरांचें सेवन करण्यांत येतें, आणि त्यांचा एकदां शरीरावर व मनावर कायमचा ताबा बसल्यामुळें, कितीतरी होतकरू तरुण संसारांत पडतात न पडतात तोंच अकालीं कालवश झाल्याचें आपण प्रत्यक्ष पाहात आहोंत.

पाश्चात्यांनीं आतां ( vitamins ) व्हिटामिन या द्रव्याचा शोध लाविला आहे. हीं व्हिटामिन्स ४।५ तऱ्हेचीं आहेत. आणि तीं शरीरसंगोपनासाठीं अत्यंत जरूरीचीं आहेत, असें ते खात्रीपूर्वक सांगत आहेत

ह्या व्हिटामिन्समधलें मुख्य व्हिटामिन, दाण्याच्या ज्या टोकांत त्याचें जीवन सांठविलेलें असतें, म्हणजे दाणा जमिनींत लावला असतां जेथून त्याचें मूळ जमिनींत जाऊन त्याचें झाड उत्पन्न होत असतें त्या टोकांत हें व्हिटामिन अत्यंत सूक्ष्म रूपांत सांठविलेलें असतें; आणि तेंच शरीरसंगोपनाचें मुख्य काम करतें. हें कबूल केल्यावर गहूं श्रेष्ठ कीं तांदूळ श्रेष्ठ या वादाचा उलगडा होतो. यंत्रांत तांदूळ साफ करून त्याला तकाकी आणतात, आणि असा तकाकणारा तांदूळ गिऱ्हाईक पसंत करतो आणि त्याला जास्त दामही देतो. यंत्रांत तांदळाचा दाणा ( polish ) सफाई होत असतांना त्याचें टोंक जेथें व्हिटामिन सांठविलेलें असतें तें ते सफाई होऊन व्हिटामिन निघून जाऊन तांदूळ निःसत्व होतो. यंत्रांत साफ केलेला तांदूळ तकाकणारा व दिखाऊ दिसतो; पण सत्वहीन असतो. उखळींत कांडून साफ केलेला तांदूळ, मजुरीमुळें महाग पडतो. पण त्यांत सत्व असतें.

गव्हाचा प्रकार तसा नाहीं. गहूं दळून त्याचें पीठ झालें, तें पाखडलें, पीठ आणि भुसा निराळा केला, तरी त्याच्या व्हिटामिनचे कण त्या पिठांत आणि भुशांत राहातातच. या उपरांत गव्हांत ( Phosphates ) फॉसफेट्च्या द्रव्यांचा भाग विशेष असतो. या सर्व कारणांमुळें यंत्रांत साफ केलेल्या तांदळापेक्षां गहूं विशेष पौष्टिक पदार्थ आहे.

पाश्चात्य यामुळें आपणा पूर्वस्थ लोकांना भातखाऊ म्हणजे निःसत्व असें म्हणतात व मानतात.

असें जरी आहे तरी ईशकृपेनें तुरीची, मसुरीची, मुगाची वगैरे डाळ भातासोबत आपण खातों. या सर्व डाळीमध्यें वर वर्णन केलेलें व्हिटामिन अबाधित राहातें. त्याचप्रमाणें बाजरी, ज्वारी, जोंधळा, चणे, वाल, वाटाणे, भुईमुगाच्या शेंगा वगैरे वस्तूंचें आपण सेवन करीत असतोंच. या पदार्थांपैकीं केवळ वाटाण्याचाच उपयोग करण्याचें पाश्चात्यांना माहीत आहे, आणि तें देखील ओल्या वाटाण्याचा. सुक्या वाटाण्याची भरड करून क्वचित प्रसंगीं त्याची आंबील अथवा सूप करून पिण्याचें त्यांना माहीत आहे.

चणे खाणें हें त्यांना अत्यंत क्षुद्र वाटतें. हें केवळ पशूंचें खाणें आहे असें ते समजतात. आपण याच चण्याचा किती तरतऱ्हेनें उपयोग करून, रुचकर पदार्थ आणि पक्वान्नें बनवीत असतों !

सारांश Struggle for existence म्हणजे जीवनकलहाच्या आहाराच्या बाबतींत आपण कितीतरी पटीनें त्यांच्यापेक्षां पुढें आणि स्वतंत्र आहोंत ! निसर्गांतल्या किती तरी वस्तु आपण उपयोगांत आणिल्या आहेत, ज्या वस्तूंच्या उपयुक्ततेची पाश्चात्यांना मुळींच कल्पना देखील नाहीं. त्यांचें जें मुख्य व्हिटामिन तें तर आपल्या रोजच्या आहारांतलें आहे. अशा बिकट परिस्थितींत आपण जीवंत राहिलों आहोंत त्याचें कदाचित् एक कारण प्रभुकृपेनें आपल्या आहारामुळें नसेल कशावरून ?

पाश्चात्य लोक मुख्यत्वेंकरून मांसाहारी आहेत. आपल्या देशांतील कांहीं उच्चवर्णीय प्रजेखेरीज गोरगरीब बहुतेक मांस व मासे खाणारे आहेत. तरी आपल्या प्रजेप्रमाणें पाश्चात्यांनाही केवळ मांसावर राहून भागवितां यावयाचें नाहीं. म्हणून त्यांना गहूं पाहिजे. गव्हाचें पीठ मळून, त्यांत ( yeast ) यीस्ट म्हणजे एका प्रकारचें जंतुमय वनस्पतिरूपि द्रव्य, घालतात. जेणेंकरून भाजतांना त्या यीस्टमधल्या जंतूंचा नाश होऊन त्यांचा गॅस म्हणजे हवेंत रूपांतर होऊन त्या भाजलेल्या रोटयांत मधमाशांच्या पोळ्याप्रमाणें असंख्य लहान लहान खोल्या बनतात. त्या खोल्यांच्या भिंती म्हणजे गव्हांचे अत्यंत पातळ असे पापुद्रे. यामुळें हें गव्हांचें अन्न पचन होण्यास सुलभ जातें. हें झालें सामान्य जनतेचें मुख्य खाद्य. याशिवाय गव्हाचे इतर पदार्थ म्हणजे केक व बिस्किटें. हे पदार्थ महाग असल्यामुळें सामान्य जनतेच्या राजरोस उपयोगांतले नव्हत.

आपल्या इकडल्याप्रमाणें गव्हांच्या पोळ्या, फुलके, सत्व, शेव वगैरे पदार्थ त्यांना मुळींच माहीत नाहींत. आतां विशेष गंमत पाहा. हे पाश्चात्य जन जे आपल्याला सुधारणेच्या टोंकावर पोहोंचल्याचा टेंभा मिरवितात, आणि आम्हाला हांसत आहेत, त्यांचें या त्यांच्या मुख्य आहारासंबंधानें अत्यंत परावलंबन कसें आहे तें !

समजा, त्यांच्या देशांत वखारींतून गहूं भरगच्च भरलेला आहे, परंतु कांहीं कारणांनीं अथवा संपामुळें पीठ दळण्याचे अथवा रोटी भाजण्याचे कारखाने बंद पडले तर चोवीस तासांत त्यांच्या प्रजेचे जे हाल होतील त्यांचें अनुमान देखील करितां येत नाहीं. तत्काळ बंडाळी माजेल, अत्याचार, खून आणि भयंकर राजक्रांत्या होतील यांत मुळींच संदेह नाहीं. यासाठींच त्यांच्या देशांतल्या मुत्सद्यांची मुख्य खटपट आपल्या रयतेला गहूं स्वस्त दरानें कसे मिळतील, आणि ते तसे मिळावे म्हणून देशांत गहूं पुरत्या प्रमाणांत कसा उत्पन्न होईल, आणि तसें करण्यासाठीं शेतकऱ्यांना

कोणत्या प्रकारची सूट व मदत देतां येईल, याविषयीं डोळ्यांत तेल घालून रात्रंदिवस त्यांचा प्रयत्न चालू असतो. इतकें करूनही जर त्यांच्या देशांत गहूं पुरत्या प्रमाणांत उत्पन्न होत नसेल तर दुसऱ्यांच्या देशांतून तो किफायतीनें कसा आणवितां येईल, आणि त्यासाठीं त्या देशांबरोबर व्याजबट्टा ( Exchange ) कसा ठेवितां येईल कीं, जेणेंकरून त्यांच्या देशांतल्या कामकरी प्रजेला रोटी स्वस्त मिळून प्रजा शांत व संतुष्ट राहील!

याच आहाराच्या बाबतींत आपण किती तरी स्वावलंबी व स्वतंत्र आहोंत याचा ज्यानें त्यानें सूक्ष्म विचार करावा. अर्थशास्त्रज्ञ मोठमोठे लेख लिहून आपलें समाधान करावयाचा यत्न करतील कीं, दाणा भरडण्याच्या मोठमाठ्या गिरण्या व भटियारखाने आणि हॉटेलें काढल्यानें रयतेला स्वस्त अन्न मिळून रयत सुखी राहील! अन्न स्वस्त मिळेल हा केवळ तर्क आहे. आणि त्याप्रीत्यर्थ यंत्रसामुग्रीसाठीं किती पैसा अडकून राहील? या सर्व गोष्टींचा विचार करतां, अशा प्रकारच्या परावलंबन स्थितीचें अनुकरण करणें, हें इष्ट आहे काय?

याच दिखाऊ पण दिशाभूल करणाऱ्या विचारसरणीनें आपण कापड, औषधें व रंग या बाबतींत आपल्या उच्च स्थितींतून च्युत होऊन पाश्चात्यांच्या महाग, बेगडी व निरुपयोगी वस्तु वापरण्यास शिकलों आहोंत!!

म्हणून या स्थितीला आपण जाऊं नये हें या लेखाच्या सुरवातीला वर्णन केलेली श्रीसांईबाबांची दळणकांडण रूपि लीला प्रत्यक्ष दाखवीत नाहीं काय? त्यांचा याविषयींचा हेतु स्पष्ट रीतीनें दृग्गोचर होत नाहीं काय?

समजा; त्या वेळीं श्रीसांईबाबांनीं त्यांच्याकडे येणाऱ्या जिज्ञासूंना स्पष्ट रीतीनें सांगितलें असतें कीं, बाबानों, तुम्ही तुमच्या घरीं दळणकांडणादि क्रिया ठेवा, स्वयंपाकावर स्वतः नजर ठेवा! बाजारची

जिन्नस खाऊं नका ! तर निदान लेखकासारखा पाश्चात्य संस्कृतीच्या अर्ध्या हळकुंडानें पिंवळा बनलेला श्रींच्या उपदेशाला "old fashioned" जुन्या पद्धतीचा आणि "useless" म्हणजे निरुपयोगी असें बोलल्या शिवाय राहाता ना !

श्रीसाईमाऊलीनें आपल्या देवळांत जातें ठेवून स्वतः दळून गोर गरीबांस व क्षुद्र दैवतादि इतरांस त्याच्या पिठाच्या भाकऱ्या भाजून तृप्त केलें याची मुख्य गोम वरील सर्व हकीकतीवरून उघड दिसते ती:—

१ ज्याप्रमाणें घरोघरीं अद्यापि पाटा आणि वरवंटा आहे त्याप्रमाणें दळावयाचें जातें पण जरूर असलेंच पाहिजे.

२ वेळांत वेळ साधून हौसेनें दळण्याकांडण्याचा प्रघात ठेवावा.

३ आपण सुस्थितींतील माणसें जर याप्रमाणें करूं तर गरीब स्थितींतील लोक आपलें अनुकरण करून गिरण्यांत पीठ दळण्यासाठीं जाणार नाहींत. आणि त्यामुळें त्यांचा वेळ आणि पैसा बचून त्यांना सुग्रास अन्न खावयास मिळेल.

४ टेनिस वगैरे खेळ आवडल्यास बेलाशक खेळावे; पण घरीं फुरसत काढून जात्यावर बसून थोडें तरी दळण्यानें जो व्यायाम होतो, व गाण्याच्या रूपानें देवाची सेवा होऊन जो मानसिक आणि शारीरिक आल्हाद होतो, त्याची तुलना टेनिस वगैरेंच्या व्यायामाबरोबर करून पाहावी.

५ दळण्याच्या संवईमुळें शरीराला व कमरेला योग्य तो व्यायाम मिळून बाळंतपणादि नैसर्गिक गोष्टी जड जात नाहींत.

६ स्वतः दळलेल्या पिठापासून केलेले पदार्थ किती गोड, रुचकर आणि स्वादिष्ट व पौष्टिक असतात हें अनुभवानें कळून आनंद होतो.

७ ही सत्तेच्या गुलामगिरीची गोष्ट नाहीं.खऱ्या प्रेमाची गोष्ट आहे ज्या गोष्टीचा अनुभव श्रींच्या पायांशीं बसून लेखकाला आल्हादकारक रीतीनें आला आहे आणि म्हणूनच तो येथें त्या विषयीं लिहीत आहे.

८ आयुष्यांतले सगळे दिवस सारखे यावयाचे नाहींत म्हणून स्वत:ला दळणकांडणासारख्या हुन्नरांची तालीम असल्यास क्वचित् प्रसंगीं गरीब स्थिति प्राप्त झाल्यास ती जड जात नाहीं.

९ यासाठीं स्वावलंबी होऊन कोणत्याही स्थितीला टक्कर देण्या-साठीं आत्मविश्वास उत्पन्न करण्याची ही एक उत्तम तालीम आहे.

१० पाश्चात्यांप्रमाणें आहारासंबंधानें परावलंबी होण्याची मुळींच चिंता नाहीं.

११ मागल्या एका लेखांत दर्शविलेला श्रींच्या भाकिताचा एक भाग सध्यांच उघड दिसावयास लागला आहे कीं, "लोक एकमेकांस फाडफाडून खातील?"

अशा दिवसांत, ज्याअर्थीं आपण सर्वांच्या घरीं दाणागल्ला थोडा फार असतोच, त्याअर्थीं घरांत तो दळून पाखडून त्याचा योग्य तो खाद्य पदार्थ बनवून अत्यंत स्वाभिमानपूर्वक, स्वातंत्र्यानें राहातां येईल. रोटी-वाला आला नाहीं, आतां काय करावें ही फिकीर राहाणार नाहीं.

जुनें तें **सर्वच** सोनें या विचाराचा लेखक मुळींच नाहीं.पाश्चात्यां-पासून उपयुक्त तें आपण जरूर घेतलेंच पाहिजे. मात्र तसें करतांना ज्या आपल्या जुन्या शिकवणींमुळें आपला आत्मविश्वास वाढेल, आपणाला या जगांत राहून ( Struggle for existence ) जीवनकार्यासाठीं खेंच-ताण, यांत आपल्या जुन्या शिकवणींतून उत्तम तें जरूर जपून ठेवून त्याचें जतन केलें पाहिजे.

इंग्रजींत एक म्हण आहे: " All that glitters is not Gold " जें सर्व झकाकतें तें सोनें नव्हे. " Old is Gold " जुनें तें सोनें. या दोन्ही वाक्यांचा काळजीपूर्वक विचार करून जेणेंकरून आपल्या दरिद्रीनारायणरूपी जनताजनार्दनाची खरी सेवा होईल इकडे खास ध्यान देण्यांत यावें.

वरीलप्रमाणें श्रींच्या पायांपाशीं बसून त्यांची एक लीला अवलोकन करून तिच्यापासून सुचलेले विचार वाचकांपुढें सादर करण्याचें, अत्यंत नम्रतापूर्वक धाडस लेखक करीत आहे, त्याचा हंसक्षीरन्यायानें विचार व्हावा ही विनंती.

ता. १ ऑगस्ट १९३० "म्हातारा"

आज ता. १० ऑगस्ट रोजीं दोनप्रहरीं श्री बाळासाहेब देव, माधवराव देशपांडे व लेखक सांताक्रूझकडे जात असतां वरीलप्रमाणें एक लेख श्री सांईलीलेंत छापावयास जात आहे असें श्री. बाळासाहेब देवांस लेखकानें सांगितलें. त्या वेळीं श्री माधवरावजींनीं श्रींच्या पायापाशीं घडलेल्या वरील हकीकताविषयीं विपुल विवेचन करून, जेव्हां जेव्हां वाऱ्याची सांथ श्री शिर्डीस येई त्या त्या वेळीं वरील प्रमाणें श्री सांईबाबा गहूं दळून त्यांतलें पीठ शिवेंच्या ओढयावर टाकीत असत. आणि तसें करण्याचें प्रयोजन वरील हकीकतीप्रमाणें सांगत असत. आणि तसें न केलें तर "तुझ्या गांवांत पराड मुडदे पाडीन" अशी त्या देवतांची धमकी असे. असेंही श्री म्हणत असत, असें श्री माधवरावजी म्हणाले.

"म्हातारा"

# अनुभव

## ॥ श्री साईबाबा प्रसन्न ॥

ठाणें ता. १७-९-३०.

सप्रेम शिरसाष्टांग नमस्कार वि. वि. मी खाली देत असलेल्या माझ्या अनुभवास श्री साई लीलेच्या एखाद्या अंकांत जागा द्यावी.

" बाबा ब्रह्मीभूत झाल्यानंतर सुद्धां आपल्या भक्तांच्या हांकेला धांवत येऊन त्यांचें संकटांतून रक्षण कसें करितात ह्याचा अनुभव मला एकदोन महिन्यांपूर्वी आला तो असा. माझ्या दोन मुलींना ( वय वर्षे १० व ८ ) सुमारें दोन वर्षांपासून केसांत उवा पडल्यामुळें फार त्रास होत होता. व त्यामुळें त्या दोघीही वारंवार आजारी पडत असत. घरचे, डॉक्टरचे व गांवठी औषधांचे सर्व उपाय केले व शेवटचा उपाय म्हणून मोठ्या मुलीचे केंस साफ बारीक करून टाकले. तरी पण केस थोडेसे वाढल्यानंतर पुनः उवांचा त्रास सुरू झाला. एके दिवशीं दोन्ही मुली स्नान करून आल्यानंतर मीं त्यांना बाबांच्या छबीपुढें उभ्या राहून " जर आमच्या उवा एकदम नाहींशा झाल्या तर आपल्या पुण्यतिथीस ५ रुपये पाठवूं " अशी प्रार्थना करावयास सांगितली. त्याप्रमाणें दोन्ही मुलींनीं प्रार्थना केली. ताबडतोब पंधरा दिवसांच्या आंत दोघींच्याहि डोकींतून उवा, लिखा, वगैरे साफ नाहींशा झाल्या व आतां उवांचा अंश सुद्धां त्यांच्या केसांत दिसत नाहीं व आज दोन महिने दोघींचीही प्रकृति उत्तम आहे.

बाबांच्या चरणांचा दासानुदास

**शांताराम धोंडु सामंत.**

ता. क.:—आज रोजीं रंगनाथ विश्वनाथ सामंत ह्यांच्या नांवें १७ रुपयांची मनिऑर्डर केली आहे. त्या १७ रुपयांपैकीं वर नमूद केलेले ५ रुपये माझे, १० रा. रंगनाथ विश्वनाथ सामंत ह्यांचे व २ रुपये बापू बाबाजी माळगांवकर यांचे आहेत. एकंदर १७ रुपये बाबांच्या पुण्यतिथीकरितां पाठविले आहेत त्यांचा स्वीकार करावा. कळावें.

आपला

**शांताराम धोंडु सामंत.**

## ॥ श्री सद्गुरू साईनाथ प्रसन्न ॥

श्री शिर्डी ता १-९-३०.

कृ. शि. सा. न. वि. वि.

श्री समर्थ सद्गुरु साईमहाराज यांची पुण्यतिथि येत्या आश्विन शु० १० गुरुवार ( विजयादशमी ) शके १८५२ ता. २-१०-३० रोजीं श्रीक्षेत्र शिरडी येथें महाराजांच्या मंदिरांत होणार आहे. तरी या समयीं आपण कृपा करून आपल्या मित्रमंडळीसह व कुटुंबांतील मंडळीसह तीर्थप्रसादास अवश्य यावें, अशी विनंती आहे.



सदर्हू कार्यासाठीं खालीं लिहिलेल्या पत्त्यावर कृपा करून वर्गणी अवश्य पाठवावी.

( १ ) श्री. रामचंद्र आ. तर्खड, १०, जर म्यान्शन, वांद्रें, ( २ ) श्री. बा. व्ही. देव, स्टेशन रोड, ५२, ठाणें, ( ३ ) श्री. सु. दि. नवलकर, प्रिन्सेस स्ट्रीट, पोलीस स्टेशनजवळ, मुंबई, ( ४ ) श्री. बापूराव बोरावके शिर्डी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर.

आपले,

केशव गोपाळ बुट्टी, सभासद,
सुंदरराव दिनानाथ नवलकर, सेक्रेटरी.
लक्ष्मण गणेश महाजनी, ट्रस्टी,
मोरेश्वर विश्वनाथ प्रधान, ट्रस्टी,
रामचंद्र आत्माराम तर्खड, खजिनदार,
बाळकृष्ण विश्वनाथ देव, ट्रस्टी.

### उत्सवाचा कार्यक्रम.

ता. २-१०-३०, आश्विन शु. १०, गुरुवार,
सकाळीं:—संस्थानचा रुद्राभिषेक व पवमानाभिषेक, मंगलस्नान, पूजा, आरती.
दुपारीं:—भोजन, पुराण, कीर्तन.
सायंकाळीं:—भजन.

ता. ३-१०-३०, आश्विन शु. ११, शुक्रवार,
सकाळीं:—संस्थानचा अभिषेक, स्नान, पूजा, आरती.
दुपारीं:—फराळ, किंवा भोजन व पुराण.
सायंकाळीं:—रथाची मिरवणूक ( किंवा चावडी ) भजन.

ता. ४-१०-३०, आश्विन शु. १२, शनिवार,
सकाळीं:—संस्थानचा अभिषेक, स्नान, पूजा, आरती व काल्याचें कीर्तन.
दुपारीं:—पुराण, नंतर ग्रामभोजन.
सायंकाळीं:—चावडी ( किंवा रथाची मिरवणूक ), भजन.

## वर्गणीदारांकरितां

१ श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याचे अंकापासून आहे. नवीन वर्गणीदारांस वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२ पत्ता बदलणें झाल्यास लगेच आम्हांस कळवावें. बदललेला पत्ता न कळविल्यामुळें कित्येक वेळां अंक गहाळ होतात.

३ अंकासंबंधीं पत्रव्यवहार आमचेकडे करावा.

४ लेखासंबंधीं पत्रव्यवहार संपादक व प्रकाशकांकडे करावा.

## वार्षिक वर्गणी.

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनिऑर्डरनें अगाऊ रु. ३।=, व्ही. पी. नें रु. ३॥, फुटकळ अंक ।= मागील अंकास शिल्लक असल्यास ॥-

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला**

## लेखकांकरितां

१. श्रीसाईलीलेंत प्रसिद्धीसाठीं पाठविलेला लेख अथवा कविता कागदाच्या एका बाजूवर,मार्जिन सोडून,सुवाच्य बालबोध लिपींत असावी. पेन्सिलीनें किंवा कागदाचे दोन्हीं बाजूस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो.

२. लिखाणासोबत पूर्ण नांव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसिद्ध न करितां टोपण नांवाखालीं प्रसिद्धि द्यावयाची असल्यास त्याप्रमाणें कळवावें.

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत पसंति अगर नापसंति कळविली जाईल. पसंति कळविल्यानंतर, आम्हांला कळविल्याशिवाय लेखकांनीं तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमचेकडे राहील. येईल तसा शब्दशः प्रसिद्ध करण्याची हमी आम्हीं घेत नाहीं.

५. लेखासोबत पुरेसें पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करूं.

प्रकाशक—**श्रीसाई लीला**

श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

मासिक पुस्तक.

वर्ष ७ वें ] [ अंक ५-६-७-८.

नलिनीदलगतजलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशयचपलम्



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णवतरणे नौका

—शंकराचार्य.

संपादकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.

# अनुक्रमणिका.


| | | | | |
|---|---|---|---|---|
| महाराजांचे अनुभव | ... | ... | ... | १— |
| „ (दक्षिणेचे) अनुभव | | ... | ... | ९— |
| स्फुट विषय ... | ... | ... | ... | ८७७-९ |
| केकावली ... | ... | ... | ... | १७७-२ |
| श्री साईसच्चरित | ... | ... | ... | ८८९-९ |


# विनंति.

सुप्रसिद्ध श्री मोरोपंत कविकृत **केकावली** या भक्तिरसप्रेमामृ ओथंबलेल्या काव्यावर कै. रा. ब. दादोबा पांडुरंग यांची " यशोदा पांडुरंग ही टीका श्री साई लीलेच्या ४–५ अंकापासून क्रमशः प्रसिद्ध करण्यांत येत

ही टीका सुमारें साठ वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेली होती, आणि अ मितीस हा ग्रंथ अत्यंत दुर्मिळ झाला आहे. तरी ग्राहक याचा फायदा घे ऋणी करतील अशी आशा आहे.

व्यवस्थापक—**श्रीसाई लीला**

## श्री साई भक्तांस विज्ञप्ति.

कोणाला श्री साईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्री सा लीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनी ते आमचे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

रा. आ. त
— प्रकाश

# विनंती

श्री बाळासाहेब देवांच्या अप्रतिम अवतरणिकेमुळें श्री साईं सच्चरित ग्रंथ बांधून प्रसिद्ध होण्यास आतां मुळींच अडचण राहिली नाहीं. तरी ग्राहकांनीं सोबतच्या कार्डावर आपलें नांव व पत्ता स्पष्ट लिहून पाठ-विण्याची कृपा करावी.

ग्रंथाचीं एकंदर पृष्ठें अजमासें ९५० होतील. कापडी बाइंडिंग

किंमत रु. २॥ ( अडीच )

ट. हां. वेगळें.

ग्रंथाचें उत्पन्न श्रींच्या कायमफंडांत भरण्यांत येईल.

रा. आ. तर्खड.

प्रकाशक.

# अनुभव.

शुक्रवार ता. ११ जुलै १९३० रोजीं श्री. गुरुपौर्णिमेच्या उत्सवाच्या दुसऱ्या दिवशीं मुंबईस परत जाण्यासाठीं, शिर्डीहून श्री. दीक्षितांच्या वाड्यांतून रा. ब. मोरेश्वरराव प्रधान, सुंदराव नवलकर, त्यांचा मुलगा व लेखक दोनप्रहरानंतर सुमारें तीन वाजतां निघाले. ओटयावर रा. हरेराम हे एका खाटेवर बसले होते. त्यांनीं प्रथम लेखकाजवळ आणि नंतर रा. प्रधान यांजपाशीं जवळ असलेल्या मुलांप्रीत्यर्थ खाऊसाठीं कांहीं पैशांची याचना केली.

प्रत्येक शुक्रवारीं आठ आण्याचे चणे मागवून लहानमोठया गरीब-थोर सर्व लोकांस वांटून देण्याचा रा. प्रधान यांचा कित्येक वर्षांपासून अबाधित नियम चालू आहे, आणि त्यांत कधींही खंड पडला नाहीं.

रा. हरेराम यांनीं याचना केली त्या वेळीं आज शुक्रवार आहे ही गोष्ट रा. प्रधान अजीबात विसरले होते. त्यांनीं हरेरामांच्या हातावर एक आणा ठेविला. हरेराम म्हणाले " अरे इतकीं पोरें येथें आहेत आणि एक आण्यानें कसें भागेल ? आणखी कांहीं दे !" तेव्हां रा. प्रधान यांच्या चटकन् लक्षांत आलें कीं, ही प्रेरणा श्रीसांईबाबांकडून होऊन आज शुक्रवार आहे, मोटरमध्यें बसल्यावर प्रवासामुळें दर शुक्रवारचा नियम चुकेल, म्हणून श्रीसांई माउलीनेंच ही सूचना देवविली असावी, आणि त्याप्रमाणें त्यांनीं आठ आणे हरेरामांच्या हातावर ठेविले आणि त्यांनीं त्या मुलांना देण्याकरितां आठ आण्याचे चणे मागविले.

लेखक त्या वेळीं मोटरमध्यें आधींच चढून बसला होता. श्रीगंगेस पाणी येऊन नांव चालू असल्यामुळें वेळेवर आगगाडी मिळेल काय याविषयीं साशंक असल्यानें प्रधान वगैरे मंडळींची चिंतातुर होऊन वाट पाहात होता.

इतक्यांत श्री. प्रधान मोटरपाशीं आले. त्यांच्या डोळ्यांतून प्रेमाश्रु वाहत होते. त्यांची ती आनंदमयी मुद्रा पाहून लेखकाची चिंता पार नाहींशी झाली; आणि रा. प्रधानांनीं घडलेली हकीकत निवेदन केल्यावर श्रीसांई

माऊलीचे आपल्या भक्तांचें ब्रीद राखण्यासाठीं काय काय आणि कसकसे उपाय आणि इलाज अहर्निश चालू आहेत याचें त्याला मोठें कौतुक वाटलें.

इतरांना ही गोष्ट क्षुल्लक वाटेल, परंतु श्रीयुत प्रधान यांची ती प्रेमाश्रुयुक्त आनंदमयी मुद्रा लेखक कधींही विसरावयाचा नाहीं.

श्रीयुत हरेराम यांनीं ही गोष्ट घडण्यापूर्वीं थोडे क्षण लेखका मुलांना खाऊ देण्यासाठीं पैशांची याचना केली होती, आणि लेखकानें त्यांच्या हातांवर दोन आणे ठेविले होते. तेव्हां हरेराम वरील प्रमाणें त्यालाही बोलले होते कीं, " इतके पैसे कसे पुरतील ? " पण त्याकडे दुर्लक्ष करून लेखक मोटरमध्यें जाऊन बसला. लेखकाची दर शुक्रवारीं स्वतःच्या पैशांनीं चणे खरीद करून ते इतरांना वाटण्याची वहिवाट नाहीं. सबब हरेराम यांच्या याचनेचा त्याच्या मनावर यत्किंचितही परिणाम झाला नाहीं. पण पाहा कीं, त्यानंतर रा. प्रधान यांच्या मनावर तोच इशारा, त्याच शब्दांनीं बाबांनीं करविला आणि त्यामुळें त्या भक्ताचें ब्रीद अबाधित ठेविलें ! ही गोष्ट लेखकाला स्वाभाविकरीत्या आनंददायी वाटली. असे प्रकार श्री साईबाबांच्या पायांपाशीं हरहमेश घडून येत असत. आणि सध्यांही भक्तांना वेळोवेळीं येत आहेत.

हे अनुभव क्षुल्लक मानूं नयेत, आणि ते इतरांना प्रसिद्ध करून कळविण्यासाठीं मुळींच अनमान करूं नये, ही लेखकाची सर्व श्रीसाई व इतर प्रभुभक्तांना वेळोवेळीं अत्यंत नम्र सूचना व याचना आहे.

आपल्या अध्यात्मशास्त्र दृष्टीनें, आणि पाश्चात्यांच्या प्रचलित मानसशास्त्राच्या आधारानें असल्या प्रेममय अनुभवांविषयीं लेखक आपल्या अल्पसमजुतीप्रमाणें पुढें मागें एखादा लेख लिहिण्याचें वाचकांच्या परवानगीनें धाडस करण्याचें योजीत आहे.

रा. आ. तर्खड

( २ )

रा. रा. चिंतामणराव रामनाथ सातघरे हे एक वांद्यांत राहाणाऱ्या जुन्यांतल्या जुन्या प्रसिद्ध कुटुंबांतील गृहस्थ आहेत. वस्ती बाजार रोड. आज ता. ७ जुलै रोजीं श्री गुरुपौर्णिमेच्या उत्सवाप्रीत्यर्थ आपली श्री गुरुदक्षिणा देण्यासाठीं माझ्या घरीं आले होते, तेव्हां त्यांनीं गेल्या महिन्यांत घडलेला आपला अनुभव सांगितला तो येणेंप्रमाणें:—

ते म्हणाले, आज कित्येक वर्षे त्यांचा नित्य नेम असा आहे कीं, प्रति सायंकाळीं श्रीसांईबाबांच्या पूजेच्या प्रतिमेपुढें दिवा लावावयाचा.

यदाकदाचित् कचेरींतून अथवा दुसऱ्या कारणामुळें घरीं परत येण्यास उशीर होण्याचा संभव असल्यास आपल्या मातुःश्रीस दिवा लावावयास सांगून नंतर ते घरांतून बाहेर पडत असतात, आणि त्याप्रमाणें ती माउली आपल्या परमपूज्य गुरुमाउलीपुढें दिवा लाऊन ठेवीत असते. या गोष्टीला कधींही खंड पडला नाहीं.

गेल्या महिन्यांत एके रविवारीं कांहीं कामाकरितां ते मुंबईस जाण्याकरितां घरांतून बाहेर पडले. ज्या अर्थी सायंकाळापूर्वी घरीं परत येण्याविषयीं त्यांचा पूर्ण भरंवसा होता त्या अर्थी आपल्या परमपूज्य मातुःश्रीळ संध्याकाळीं श्रींच्या पुढें दिवा लावून ठेवण्याची त्यांना आवश्यकता वाटली नाहीं, आणि त्यामुळें त्या माऊ लीला त्यांनीं तसें करण्यास सांगितलें नाहीं.

मुंबईंत ज्या कामासाठीं ते गेले होते तें काम पुरें व्हावयास बराच वेळ लागला, आणि त्यानंतर कांहीं स्नेहीमंडळींच्या आग्रहावरून त्यांच्यासह एक नामांकित चित्रपट पाहाण्यासाठीं ते निघाले.

सायंकाळ होऊन दिवे नुकतेच लागले होते.

चित्रपट सुरू होऊन थोडाच वेळ झाला असेल इतक्यांत फिल्म तुटली. ती दुरुस्त होईपर्यंत सिनेमागृहांत पुन्हां रोषणाई करण्यांत आली होती. इतक्यांत एकाएकीं पॉवर जाऊन सर्व दिवे विझले आणि काळोख झाला. चित्रपटही दुरुस्त होईना. याप्रमाणें थोडीं मिनिटें गेल्यावर चिंतामणराव यांच्या मनांत विचार आला कीं, अरे मी येथें चित्रपट पाहाण्यासाठीं आलों

आहे आणि घरीं बाबांच्या जवळ वत्ती लावावयास सांगून ठेवण्याचें विसरलों आणि आई जी न विसरणारी तीही कदाचित् विसरली असेल, आणि बाबा अंधारांत असतील याची स्मृति देण्यासाठीं बाबांचा हा इशारा कशावरून नसेल बरें ! "

हा विचार डोक्यांत येतांक्षणींच, तात्काळ त्या मित्रमंडळीला तेथेंच त्या अंधारांत सोडून मी त्या सिनेमागृहांतून बाहेर पडलों, आणि तडक स्टेशनाकडे धांवत गेलों. कर्मधर्मसंयोगानें मला इलेक्ट्रिक गाडीही तावड-तोब मिळाली. वांद्रास उतरतांच धांवपळ करीत घरीं गेलों आणि पाहातों तों, बाबांच्या पुढें दिवा लावावयास आई खरोखरीच विसरली होती, आणि बाबांच्या प्रतिमेपुढें अंधार होता.

" बाबासाहेब ! तुम्ही कांहीं म्हणा ! मी एक अल्प अज्ञबालक आहे; परंतु या प्रत्यक्ष दाखल्यानें माझें अंतःकरण भडभडून आलें. आणि ही गोष्ट माझ्या जन्मांत मी कधींही विसरणार नाहीं. श्रीसांई माउली जरी बाह्यदृष्टीनें अगोचर झाली, तरी याप्रमाणें आम्हासारख्यांना प्रत्यक्ष दाखले देऊन आम-च्यावर आपलें प्रेम स्पष्टपणें दृग्गोचर करून, आपल्या प्रेमपाशांत कसें घट्ट बांधून ठेवीत आहे, हे त्यांचे कितीतरी उपकार आहेत ! "

श्री. चिंतामणराव हे एक तरुण गृहस्थ आहेत. वरील हकीकत सांगतांना त्यांचा कंठ सद्‌गदित होऊन त्यांना गहिंवर आला होता. तें दृश्य पाहून मला स्वाभाविक आनंद झाला व मी म्हणालों " काय ही बाबांची लीला ! "

ता. ७ जुलै
१९३०.

रा. आ. तर्खड

( ३ )

इ. स. १९११ सालीं होळीनंतर दोन दिवसांनीं ही गोष्ट घडली.

त्या वेळीं श्रींच्या मशिदीपुढें सभामंडप नव्हता. रखरखीत उन्ह पडलें होतें. चालतांना पाय पोळत होते. सुमारें दोन वाजले असतील. अशा वेळीं ८--१० दिवसांचें एक बकरीचें बच्चें धांपा टाकीत, झोंके खात मशिदीसभोंवत्या पटांगणांत आलें आणि त्या भयंकर उन्हांत पडलें.

मित्राच्या बायकोला तें पाहावेना. ती तशीच उठून पायऱ्या उतरून त्या बच्चाजवळ गेली. कांहीं गांवकरी देखील तेथें आले. त्यांनीं त्या बच्चाला तपासलें, आणि मित्राच्या बायकोला सांगितलें कीं, तें बच्चें मेलें. तेव्हां तिला अत्यंत वाईट वाटलें.

केंविलवाणें तोंड करून ती बाबांच्या कठड्यापाशीं गेली आणि रडें येऊन बाबांना म्हणाली.

" बाबा ! तें बच्चें मेलें ! "

बाबा हा सर्व प्रकार बसल्या जागेवरून पाहात होतेच. ते म्हणाले:

" आये तें मेलें नसेल. उन्हाची तिरीप लागून पडलें असेल ! "

" नाहीं बाबा ! तें मेलें ! "

" होय ? " असा प्रश्न करून बाबा उठले. पाण्याच्या तोटीचें एक टमरेल घेऊन पायऱ्या उतरून त्या बच्चाजवळ गेले. त्यांनीं पाण्याची धार धरून त्या बच्चाला प्रदक्षिणा घालून त्या बच्चाच्या तोंडांत थोडें पाणी ओतलें.

त्याबरोबर तें निस्तेज झालेलें शरीर एकसमयावच्छेदेंकरून थरथरलें, आणि त्याचा श्वाच्छोच्छ्वास सुरू झाला. तेव्हां बाबा म्हणाले.

" आये , कोठें ग तें मेलें होतें ? " मीं तुला सांगितलें कीं, उन्हाची तिरीप लागून तें बेसावध झालें होतें ना ? "

तेव्हां गांवकरी म्हणाले, " बाबा ! त्याला श्वास होता कोठें ? "

बाबा हांसून म्हणाले " चला, गर्दी करूं नका. तें आतां उठून चाललें जाईल " आणि याप्रमाणें तें बच्चें उठून उभें राहिलें आणि ब्यां ब्यां करीत टुण टुण उड्या मारीत गेलें.

हें दृश्य पाहून सर्वांना आनंद झाला.

यानंतर कांहीं काळानें एक दुसरा प्रकार झाला. तो असा. या गांवच्या एका बाईचा एकुलता एक १०-१२ वर्षांचा मुलगा सर्पदंश होऊन मृत्युपंथाला लागला. वेळा मध्यान्ह रात्रीनंतरची होती. बाई आक्रोश करीत बाबांजवळ गेली आणि तीर्थाची याचना करावयास लागली. बाबा तें तिला देईनात. उदी पण देईनात. इतकेंच नव्हे तर तिला बोलले कीं, "त्याच्या आड येऊं नकोस!"

थोड्या वेळांत तो मुलगा वारला. कै. भाऊसाहेब दीक्षितांना तें पाहावेना. ते काकूळत करून बाबांना आर्जवानें सांगूं लागले कीं, त्या मुलाला जीवंत करावें.

बाबा म्हणाले "भाऊ, तूं या भानगडींत पडूं नकोस" तरी दीक्षितांनीं आपली विनवणी चालूच ठेवून बाबांच्या हातापायांसारखे पडत होते. तेव्हां बाबा सरतेशेवटीं म्हणाले "भाऊ! त्या मुलाची योग्य व्यवस्था झाली आहे, आणि त्या त्याच्या नव्या देहांतून त्याच्याकडून निराळी कामगिरी होणार आहे, जी त्याचें हें सध्यांचें दिसणारें शरीर कधीही करूं न शकतें. आतां तूं सांगतोस त्याप्रमाणें त्यानें त्याचें नवें शरीर टाकावें, म्हणजे तिकडे मरावें, आणि इकडे पुन्हा जीवंत व्हावें. हें तुझ्यासाठीं मी करतों, पण त्याचा पुढें काय परिणाम होईल याचा तूं विचार केलास? त्याची जबाबदारी तूं जाणतोस? आणि ती घेण्याला तयार आहेस काय?"

हें ऐकतां क्षणींच दीक्षितांच्या मनांत प्रकाश पडला कीं, त्याप्रमाणें त्या मुलाला जीवंत करणें म्हणजे श्रींनीं आपल्या प्रचलित देहाच्या आयुर्मर्यादेंतला कांहीं भाग त्याला देऊन आपली जीवनक्रिया त्या प्रमाणानें कमी व्हावी, आणि असें होऊन देखील त्या मुलाच्या त्या देहाकरवीं इष्ट कामगिरी होणें तर नव्हतेंच. हा प्रभूचा सर्व खेळ लक्षांत घेऊन अनुतापयुक्त सप्रेम व सद्गदित होऊन दीक्षितांनीं श्रींचे पाय घट्ट धरिले.

अलबत श्री साई बाबांसारख्या दिव्य पुरुषाला तो मृत देह पुन्हा जीवंत करणें ही कांहीं कठिण गोष्ट नव्हती. ज्यांनीं यकःश्चित बकरीचें मेलेलें

पोर आम्हां सर्वांच्या देखत जीवंत केलें तें मनुष्यरूपी पोर जीवंत करीनात ? यापासून काय निष्कर्ष निघतो हें आपण ब्रह्मीभूत श्री भास्करानंद सरस्वतींच्या चरित्रापासून अशाच तऱ्हेची मागें निवेदन केलेली गोष्ट लक्षांत घेतली असतां कळण्यासारखें आहे.

नडिया शहरांत सब जज्जाच्या मुलाला १७ व्या वर्षीं मृत्यु होता. ही ज्योतिःशास्त्राची गोष्ट बाजूला करून त्याचें आयुष्य आणखी चार वर्षांनीं वाढविलें, आणि ज्या दिवशीं आपण आपला अमोलिक देह श्री काशींत ठेविला, त्याच दिवशीं, त्याच वेळीं तो मुलगा नडिया शहरीं मृत्युवश होतो, या कांहीं काकतालीय न्यायाच्या गोष्टी नव्हत. वात्सल्यप्रेमाचा प्रभावच असा आहे. या दिव्य व्यक्ति म्हणजे तुम्हां आम्हांसारखीं साधारण मनुष्यें नव्हत. आणि म्हणूनच त्यांना श्रीहरीचींच दृष्य रूपें मानल्याशिवाय राहावत नाहीं, गत्यंतर नाहीं.

त्या नडिया शहरांतल्या मुलाच्या आजीच्या भक्तीला वश होऊन, तिच्या भक्तीच्या भरपाईप्रीत्यर्थ निसर्गाच्या ज्योतिःशास्त्राच्या आधारानें त्या मुलाची आयुर्मर्यादा त्याच्या जातकाप्रमाणें ठरलेली असतां, तिला बाजूला सारून त्या मुलाला आणखी चार वर्षें वांचविलें, आणि तसें करतांना असें स्पष्ट सांगितलें कीं, " या माझ्या शरीरांत जोंपर्यंत प्राण आहे तोंपर्यंत हा मुलगा वांचेल ! " झालेंही तसेंच. त्या मुलाच्या एकविसाव्या वर्षीं तो एका गुरुवारीं घोड्यावरून पडला आणि बेशुद्ध झाला तो रविवारीं माध्यान्हीं बारा वाजतां वारला. इकडे श्रीकाशी क्षेत्रांत श्रीभास्करानंद सरस्वती, पूर्ण योगी, यांना त्याच गुरुवारीं कॉलऱ्यासारखा विकार झाला. दुसऱ्या दिवशीं साफ बरे होऊन बैठकीवर नित्याप्रमाणें बसले. रविवारीं पहांटेला पुन्हा रेच सुरू होऊन माध्यान्हीं बरोबर बारा वाजतां आसन ठोकून त्यांनीं देहाचें विसर्जन केलें. त्या वेळीं श्री काशीचे सिव्हिल सर्जन वगैरे मोठमोठे इंग्रज अंमलदार, ज्यांचें महाराजांवर अतोनात प्रेम होतें—त्या सर्वांच्या समोर अत्यंत विस्मयकारक रीतीनें हा खेळ केला.

यावरून काय समजावयाचें ? श्री भास्करानंदांनीं त्या मुलाच्या बापाच्या आणि आजीच्या भक्तीला भुलून आपली आयुमर्यादा चार वर्षांनीं कमी करून निसर्गाच्या ज्योतिःशास्त्राच्या नियमांना बाजूला सारून, ती त्या मुलाला दिली ही गोष्ट उघड होते.

या गोष्टी श्री साईलीलेंत देण्याचा उद्देश मुख्यत्वेंकरून हाच आहे आणि लेखक याविषयीं अनेक वेळां कंटाळा येईल अशा रीतीनें पुनः पुनः विवेचन करीत आहे कीं, या केवळ कल्पित भाकडकथा नाहींत; परंतु प्रत्यक्ष घडलेल्या गोष्टी आहेत. त्यांत यत्किंचितही अतिशयोक्ति नाही. या सृष्टींत इतक्या कांहीं आश्चर्यकारक गोष्टी आहेत कीं, त्याविषयीं साधारण माणसाची मति गुंग होते. मतलब हा कीं, आपणा सर्वांमध्यें किती अमर्याद सामर्थ्य आहे याविषयीं पूर्ण भरंवसायुक्त अंतःकरणानें विश्वास धरून विचार करून सर्व प्रकारच्या संकटांना टक्कर देण्यांत येईल अशी कामगिरी करण्यास सर्वांनीं सरसकट प्रवृत्त व उद्युक्त व्हावें हा या नम्र लेखकाचा केवळ एकच हेतु आहे.

ज्योतिःशास्त्रप्रमाणेंच सर्व कांहीं पूर्व योजिलेल्या प्रकाराप्रमाणें घडतें याविषयीं प्रसंग पाहून एखादा लेख लिहिण्यांत येईल.

**म्हातारा**

## विनंती.

धुळें येथें श्री शंकरराव देवांच्या अविश्रांत संपादकत्वाखालीं प्रसिद्ध होणाऱ्या श्री रामदास व रामदासी या गोड मासिकाच्या चालू वर्षाच्या श्रावण महिन्याच्या अंकांत श्री वा. दा. तळवळकर यांचा मनोबोध ( autosuggestion ) हा लेख जिज्ञासूनीं जरूर अवलोकनांत घ्यावा.

अशा प्रकारचीं प्रचलित पाश्चात्य व आपल्या पूर्वकालीन विचारांच्या आधारांनीं युक्त अशीं विवेचनें प्रसिद्ध झाल्यास भक्तिमार्गासंबंधानें जीं खोडसाळ विधानें पसरलीं आहेत तीं दूर होऊन, भक्तिमार्गाचें ओजस्वी व तेजस्वी जालीम-रूप जनतेस कळून योग्य ती अत्यंत परिणामकारक स्वयंस्फूर्ति प्रत्येकात उत्पन्न झालीच पाहिजे.

**रा. आ. तर्खड**

संपादक

## महाराजांचे दक्षिणेचे अनुभव.

### ( ४ )

श्री बाळासाहेब देवांचा श्रींच्या दक्षिणेविषयींचा विद्वत्ताप्रचुर लेख वाचून दक्षिणेसंबंधानें लेखकाला आठवणी होतात; त्यापैकीं कांहीं:—

१ इ. स. १९१० सालच्या डिसेंबर महिन्याचा पहिला आठवडा.

लेखकाची श्रींच्या चरणदर्शनाची ही दुसरी खेप. त्याच वर्षाच्या सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत श्रींचें त्याला प्रथम दर्शन झालें होतें.

त्या वेळीं श्री सांईबाबा इतरांजवळ दक्षिणा मागत असलेले त्यानें पाहिले होते. आणि जरी तो तेथें ४–५ दिवस राहिला होता तरी श्रींना त्याच्याजवळ कांहीं देखील दक्षिणा आपण होऊन मागितली नव्हती.

या दुसऱ्या खेपेला सकाळीं विहिरीवर ( लेंडीजवळच्या. जिचा सध्यां उपयोग होत नाहीं ) स्नान केल्यावर श्रींच्या हातावर एक रुपया दक्षिणा ठेवावी असा त्यानें मनांत संकल्प केला कां, तर सत्पुरुषाचें दर्शन रिक्त हस्तांनीं घेऊं नये असा रिवाज त्यानें पाहिला होता. त्या प्रमाणें तो श्रींच्या पायांजवळ जातांच श्री म्हणाले, " अरे ! कांहीं दक्षणा–बिक्षणा देतोस काय ? "

तो म्हणाला, " होय बाबा ! काय देऊं ? "

बाबा म्हणाले, " दोन रुपये दे. " त्यानें ते तात्काळ दिले आणि मंडळींत बसला. त्या वेळीं त्याच्या बाजूला एक प्रसिद्ध विद्वान राज्यकार्य धुरंधर असे मोठे गृहस्थ बसले होते.

या गृहस्थाविषयीं लेखकाला त्या वेळीं आणि अद्यापपर्यंत अत्यंत आदर आहे. हा सांप्रतचा लेख कदाचित् त्यांच्या अवलोकनांत आला आणि त्याविषयींची त्यांना आठवण असली तर तो वाचून त्यांना आनंद होईल, अशी लेखकाची पूर्ण खात्री आहे. असो ! लेखकानें त्यांना हळूंच विचारलें, " दादासाहेब ! बाबा दक्षिणा मागतात हें काय हो ? "

ते म्हणाले, " मग सांगेन. "

पुन्हा कांहीं वेळानें तोच प्रश्न केल्यावर श्रींच्याकडे नजर ठेवून ते हळूंच म्हणाले, " मला वाटतें कीं, ही दक्षिणा घेऊन बाबा आपली किल्मिषें नाहींशीं करितात. " हे शब्द त्यांनीं इतक्या हलक्या स्वरानें उच्चारिले होते कीं, ते चारसहा आंगळा पलीकडे कधींही कोणाला ऐकूं जाते ना.

बाबा तर चांगले सात आठ हातांवर त्यांच्या त्या गोणपाटाच्या रक-ट्यावर बसले होते. गर्दी मनस्वी होती, आणि त्यामुळें गलबलाही मनस्वी होता. धुणीच्या सर्पणांतून निघणारा धूर सर्वांना बेजार करीत होता. छप-रांतून धूर जाण्यासाठीं त्या वेळीं धुरांडें नव्हतें. अशा या गलक्यांतून लेख-काच्या कानांजवळ उच्चारलेले ते शब्द अगदीं जवळ बसणाऱ्या कोणालाही

ऐकूं जाणें अशक्य होतें. परंतु तशांतही एकदम गंभीर मुद्रा धारण करून श्री त्या विद्वान गृहस्थांना म्हणाले, "भलतं भलतं त्यांना काय सांगतोस ? भाऊ, तूं त्यांचं कांहीं ऐकूं नकोस !" तेव्हां ते विद्वान गृहस्थ हात जोडून म्हणाले, "नाहीं ! नाहीं बाबा ! मीं चुकलों !" हे त्यांचें शब्द आणि ते उच्चारतांना त्यांची झालेली मुद्रा लेखक कधींही विसरणार नाहीं.

सर्व अतर्क्य गोष्टी. तेव्हां लेखकानें या दक्षिणेसंबंधानें विचार करण्याचेंच सोडून दिलें. इतकें मात्र खरें कीं, बाबा कांहीं निमित्तालें दक्षिणा मागतात. तें निमित्त आपल्या आकलनाच्या बाहेर असल्यामुळें, आपण संकल्प केलेल्या, आपल्या बरोबर आणिलेल्या रकमेच्या बाहेर बाबा जेव्हां दक्षिणा मागत आणि ती द्यावयास आपणाजवळ साधन नाहीं असें कळून येई तेव्हां त्याला आपलें सामर्थ्यहीनत्व स्पष्टपणें कळून येत असे.

"जा ! अमक्याकडून मागून आण !" आतां ज्याच्याकडे जाण्याची आज्ञा व्हावी त्या इसमाचा दर्जा आपल्यापेक्षां मोठा असावा. कधीं कधीं त्या इसमाचा दर्जा इतका लहान असावा कीं, याचकाला आणि दात्याला दोघांनाही विस्मय वाटावा. आपण आज्ञेप्रमाणें त्या इसमाकडे जावें. नकार ठरलेलाच असे. रिकाम्या हातानीं बाबांकडे परत यावें. बाबानीं विचारावें, "तो काय बोलला रे ?" उत्तर द्यावें, "तो म्हणाला बाबांना आमचा नमस्कार सांगा." बाबांनीं म्हणावें, "हं अ अ !" असा प्रकार व्हावयाचा. कधीं कधीं मुंबईस परत कसें जातां येईल ही देखील चिंता वाटावयाची, आणि आपण गरीब, येथें कशाला आलों कीं, बाबानीं मागितलेली दक्षिणाही आपणाला देतां येऊं नये, असेंही वाटावें. सारांश, मनाची बरीच चलबिचल होत असे. परंतु तितक्यांत बाबांचें अतर्क्य सामर्थ्य व आपल्या सर्वांविषयींची त्यांची पूर्ण कळकळ ही जाणीव उत्पन्न होऊन ती त्या चलबिचल झालेल्या मनाला शांत करीत असे.

या शिकवणीची अध्यात्मिक बाजू काय असेल ती असो. तिचा विचार योगी आणि जिज्ञासू यांनीं करावा. श्रींच्या देहावसनानंतर या जगांत होणाऱ्या घडामोडी आणि आघात यांना गृहस्थाश्रमी या नात्यानें टक्कर देण्यास सर्वांतर्यामीं श्री साईबाबारूपी दिव्य व्यक्तीवर सर्व प्रकारची भिस्त ठेवून या जगांत शांत वृत्तीनें आयुष्याचे दिवस कसे काढावे, हें शिक्षण लेखकाला या शिकवणीमुळें मिळालें आहे खास. ईश्वरविषयक वृत्तींत जें आंदोलन होत असतें तें स्थिर होण्याला ही दक्षिणारूपी तालीम त्याला अत्यंत परिणामकारक झाली आहे खास.

( २ ) पुष्कळ वेळां दक्षिणेची मागणी करून बाबा ती अमक्यापासू आण, असें लेखकाला सांगत आणि त्याप्रमाणें तो तेथें गेला असतां काही तरी अशा प्रकारची अध्यलिक चर्चा चाललेली असे कीं तिच्या पासून त्याला तसेंच इतरांना अरसपरस खास लाभ व उपयुक्त माहीती प्राप्त होत असे

( ३ ) इ. स. १९१३च्या होळीच्या सणानंतर थोडयाच दिवसांत घडलेली ही गोष्ट.

लेखक बाबांच्या पायांपाशीं बसला असतां श्रींनीं त्याच्याजवळ पांच रुपये दक्षिणा मागितली. तेव्हां त्यानें आपली खिशांतली पैशाची पिसवी उघडून पाहिली तेव्हां पांच रुपये सुटे नव्हते; परंतु एक पांच रुपयांची नोट होती. ती तो देऊं जातो, इतक्यांत इतर डळी म्हणाली, 'बाबा नोटा घेत नसतात.' तेव्हां आपणांला येथें याच वेळीं सुटे रुपये कसे मिळतील हा विचार त्याच्या मनांत येतांच बाबा म्हणाले, " नोट दे. " ती बाबांनीं घेतां क्षणींच त्याला आनंद झाला. बाबांनीं ती नोट उलटी सुलटी करून नंतर त्याला म्हणाले, " भाऊ ! ही नोट तुला मी परत देतों. जपून ठेव बरें !" त्याला त्या शब्दांची विशेष किंमत वाटली नाहीं आणि नोट तशीच आपल्या " हंटिंग " कोटाच्या बाजूच्या खिशांत कोंबली. कीं जिकडून ती पडण्यासारखी नव्हती. तेव्हां बाबा पुन्हा म्हणाले, "भाऊ ! नोट जपून ठेव ना का ?" खिसा चांचपून तो म्हणाला, " होय बाबा जपून ठेविली आहे. "

बाबा म्हणाले, "अरे चोरून जाईल रे !" बाबांच्या या शब्दांची तरी त्यानें किंमत करावी ! राम शिवा गोविंदा !"

दीक्षितांच्या वाड्यांत परत आल्यावर वरच्या माडीवर गच्चीच्या दरवाज्याच्या डाव्या बाजूच्या खुंटीला त्यानें आपला कोट लटकाविला आणि मंडळींबरोबर खालीं जेवावयास उतरला. जेवण होऊन माडीवर जाताक्षणींच त्यानें आपला खिसा तपासला, आणि पाहतो तों नोट नाहींशी झालेली त्याला आढळून आली. खाली जेवण चाललें असतां एक व्यक्ती जिना चढून माडीवर गेल्याचें समजलें. या मनुष्याला वर जाण्याची सक्त मनाई होती आणि त्यानें अनेक वस्तु लांबविल्याचा दीक्षितांचा आरोप होताच आणि त्या इसमाला बोलावून पोलिसांच्या ताब्यांत दीक्षित देणार होते पण लेखकानें तसें त्यांना करूं दिलें नाहीं, यामुळें त्या इसमाचा दीक्षितांवर कायमचा रोष राहिला आहे.

श्री सांई बाबांच्या करुनीचा "खिसा" याविषयीं एखादा लेख पुढील कांहीं प्रसंगीं येईल.

"म्हातारा"

( ५ )

डिसेंबर १९२२ मध्यें मी रजेवर कोकणांत गांवीं असतांना श्री माडयेबुवा यांची भेट त्यांनींच स्थापन केलेल्या "श्री सांई दरबारांत" कुड ( संस्थान सावंतवाडी ) येथें झाली. तेथें श्री बाबांची मोठी व वैराग्यसं प्रतिमा ठेवण्यांत आलेली आहे. अर्थात् अशा तेजस्वी विभूतिकडे पाहून कं स्वर्गीय आनंद होणार नाहीं ! माझा तर आनंद द्विगुणित झाला आणि तेथें मिळालेल्या "सांईलीला" अंक वाचनानें भक्तिप्रेमास भरतें आलें.

गुरुश्रेष्ठ बाबांची सोज्वळ तसबीर आपणांजवळ सदैव असावी असें वारंवार वाटूं लागलें, "साधूश्रेष्ठाच्या प्रतिमाप्रभेपासूनही मन भक्तिमय

बनतें." त्यानंतर जानेवारी १९२४ सालीं मला नाशिक पोलिस ट्रेनिंग स्कूलमध्यें जाणें भाग पडलें. पंधरा दिवसांनी मी श्री बाबांची तसबीर रा. रा. देव (हल्लीं पोलिस सब-इन्स्पेक्टर मुंबई) जे माझ्याबरोबरच तेथें होते, त्यांच्या घरीं पाहिली. आणि माझ्या विनंतीवरून त्यांच्या जवळ असलेली एक कॉपी मला मिळाली व तेथेंच असतांना कांहीं दिवसांनीं पोटांत एका प्रकारची इजा उत्पन्न झाल्यामुळें डॉक्टरच्या सांगण्यावरून ऑपरेशन करण्यासाठीं मुंबईत रजा घेऊन येण्यास निघालों. अशा तऱ्हेनें रात्रौ स्टेशनवर येतों तोंच एक गुजराथी गृहस्थ भेटले. सहज बोलणें होतां होतां, त्यांनीं परत मुंबईस जाण्याचें कारण विचारलें, म्हणून मी त्यांना माझी सविस्तर हकीकत निवेदन केली. त्यावरून ते म्हणाले कीं "निदान आणखी वीस दिवस आपण ऑपरेशन न करणें हें बरें. कारण ग्रह फारच वाईट आहेत." ह्या गृहस्थाचें नांव नारायणराव असून ते एका खाणावळीचे मालक होते. योगायोग असा कीं, पुढें त्यांचें नांव श्रीसाईलीलेंत माझ्या पाहाण्यांत आलें आणि ते मला स्टेशनवर भेटल्याची चटकन् स्मृति झाली. हे श्री बाबांचे भक्त आहेत. त्यांनीं सांगितल्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं मी मुंबईंत आल्याबरोबर मुद्दाम चौकशी केली. तों काय खरेंच वीस पंचवीस दिवस ग्रह अति वाईट असून जिवाला फार अपायकारक असल्याचें कळलें. नंतर पंचवीस दिवसांनीं केलेल्या ऑरेशनमधून लवकरच बरा झालों, परंतु कांहीं दिवस स्वस्थपणें पडून राहाण्यास डॉक्टरनें सांगितलें होतें. अर्थात रजा वाढविणें भाग पडलें आणि त्या मुदतींत माझें नांव नाशिक पोलीस स्कूलमधून काढून टाकण्यांत आलें व त्यामुळें पुन्हां सब इन्स्पेक्टरची जागा मिळणें अशक्य हेंहि ठरल्यासारखें झालें. आजारीपणांत खर्च झाला तो झालाच व शेवटीं निकालही समाधानकारक नाहीं, म्हणून रात्रंदिवस काळजी लागली; परंतु श्री बाबांचे गुणानिवाद ऐकल्यापासून मी त्यांचे रोज मनःपूर्वक स्मरण करीत असे. नंतर कांहीं दिवसांनीं बरा झाल्यावर मुंबईंत डेप्युटी पोलीस कमिशनर साहेबांकडे मी हजर झालों आणि त्यावेळीं माझ्या खिशांत रा. देव यानीं दिलेली श्रींची तसबीर होतीच. मी पूर्वी ॲसब-इन्स्पेक्टर होतोंच परंतु

त्यांनी थोडी विचारपूस करून मला पुन्हा सब इन्स्पेक्टर नेमलें. असा हें केवळ श्रीबाबांच्या कृपेचें फल होय. ही गोष्ट सप्टेंबर १९२४ मध्यें झाली.

पुढें तीन चार महिन्यांत श्री दत्तदास माडयेबुवा यांच्या बरोबर श्री. हरेराम यांची भेट झाली. हे बाबांचे एकनिष्ठ भक्त आहेत. भक्ताकरवीं बाबांच्या भक्ति-प्रधान लिला ऐकून मन भक्तिभावानें उचंबळून आलें, तसाच आल्हाद झाला आणि त्याच भावनामय मनानें १९२५ सालीं प्रथमच शिरडीस बाबांच्या समाधि-दर्शनास जाण्याची प्रेरणा केली. त्याप्रमाणें त्यांच्यासह जाणें झालें. म्हणून त्या दिवसापासून त्यांच्या प्रत्येक पुण्यतिथीस ( दसरा ) जाण्याचा क्रम ठेविला आहे.

माझा मुलगा मनोहर हा अठरा महिन्यांचा असतांना ती चार दिवस फारच आजारी होता. चवथ्या दिवशीं तर त्यानें डोळेसुद्धां उघडले नाहींत. स्थिती निराशाजनक होऊन आम्हांस चिंतेनें पूर्णपणें घेरलें आहे, तोंच रात्रौ ८-३० च्या सुमारास श्री. हरेराम यांचें आमच्या घरीं येणें झालें. त्यांनीं पाहिलें तों काय मुलगा अत्यावस्थ स्थितींत ! झालें ! त्यांनीं तात्काळ आपल्या झोळींतून बाबांची उदी काढली, त्याच्या कपाळास व पोटास लावली. थोडा वेळ बसून त्यांच्या एका ओळखीच्या गृहस्थाकडे श्रीसत्यनारायणाची पुजा होती तिकडे मला घेऊन गेले. इकडे अकरा वाजतां मी परत घरीं येऊन पाहातों तों काय चमत्कार ! मुलगा घरांत स्वच्छेनें खेळत आहे. आणि तो इतका कीं, आज-पर्यंत तो कधींच इतक्या हर्षेनें खेळला नव्हता किंवा हांसलाही नव्हता, असे आमच्या आईनें उद्गार काढिले आणि पाहाणाराला तर त्याच्या मुखावर आजारी-पणाची छटाही दिसली नसती. हा सर्व खेळ कसला ?—तर बाबांच्या उदिचा ! पुण्यात्म्याच्या दयेचा ! झालें ! घरांतील सर्व मंडळीचा उदिरुपीं-विभूतिवर पूर्ण विश्वास बसला.

१९२८ साली दसरा आणि मोहरम एकाच दिवशीं आल्यामुळें मला रजा मिळण्यासारखी नव्हती. मला तर जाण्याची अतोनात उत्कंठा लागलेली

दसऱ्याच्या आधीं दोन दिवस, श्रीसांई बाबांचें दर्शन स्वप्नांत झालेलें आणि त्यांनीं एका कागदावर सही केलेली आहे असें दिसलें. मी जागा झालों व रात्री पाहिलेल्या मूर्तिबद्दल धन्यता वाटली. सकाळीं रजेसाठीं अर्जी केली. तावडतोब रजा मंजूर झाली आणि मुलांमाणसांसह पूण्यतिर्थीस ( शिरडीस ) हजर झालों. दिवसें दिवस घरांत सर्वांकडून बाबांचें मनस्मरण होऊं लागलें. कोणतेंही संकट आलें की, तें बाबांच्या कृपेनें पार होत असे व जरा कांहीं कमी जास्त झाल्यास तें बाबांना सांगावेसें वाटे. त्यावेळीं माझा मुलगा अडीच ( २॥ ) वर्षांचा होता. पण त्याला जरा कोठें लागलें अगर पडला तर बाबाबांच्या प्रतिमेकडे जाऊन नमस्कार करून तो जवळ असलेली उदी लावित असे.

१९२७ सालीं पोलिस कमिशनर साहेबांकडून मला लिहून आलें कीं, तूं ॲक्टींग असल्यामुळें जूलैमध्यें कमी व्हावें लागेल, कारण नाशिकहून पास होऊन आलेल्या उमेदवारांना जागा रिकाम्या करून दिल्या पाहिजेत. आतां आमचें गाऱ्हाणें श्रीसमर्थ बाबांशिवाय कोण ऐकणार ? पण हांकेला देवानें ओ दिला आणि पुन्हा तीन चार दिवसांनी हुकूम आला कीं, सध्यां तुम्हांला कमी करीत नाहीं.

गेल्या वर्षी ( फेब्रुवारी १९२९ ) मुंबईत हिंदु-मुसलमानांचा दंगा झाला. त्या दंग्यांत दोन तीन दिवस झोंप नव्हतीच. पण दिवसांतून एक वेळसुद्धां जेवण मिळत नसे. एके दिवशीं मी परेल येथें मशीदीजवळ ड्यटीवर होतों. आधल्या दिवशीं माझा निराहार उपवास होताच. पण दुसऱ्या दिवशीं कांहींच. खावयाला मिळालें नाहीं. संध्याकाळीं ३-१५ च्या सुमारास मला बरें वाटत नसल्याचें माझ्या वरिष्ठ अधिकाऱ्यास मी सांगितलें त्यांनीं थोड्या वेळानें एका युरोपियन ऑफिसरास माझ्या जागेवर पाठविलें. मी घरीं गेलो. एका तासानें मला कळलें कीं, दंगेखोरांनीं माझ्या जागीं आलेल्या साहेबास ( डेप्युटी इन्स्पेक्टर प्रिसली ) यांस ठार मारलें. धन्य धन्य त्या सांई माऊलीची कीं जिनें मला दोन दारुण व बिकट प्रसंगीं तारलें !

( ६ )

पुढें आठ दिवसांनीं ( १५ फेब्रुवारीस ) मी आजारी पडलों. चार दिवस सतत औषधोपचार केला. बरें वाटेना म्हणून पोलीस-हॉस्पिटलमध्यें राहिलों. तेथें दुखणें टायफॉइडचें असल्याचें कळलें. ताप दिवसेंदिवस वाढूं लागला. सतराअठरा दिवस झाले. जरी मी इतका आजारी होतों तरीं श्री समर्थ बाबांचें स्मरण वेळोवेळीं होत असे आणि दिवसांतून दोन तीन वेळां उदी लावीत असे. शेवटीं एका मंगळवारीं ताप फारच चढला. रात्रीं झोंप नसून मी फक्त गुंगींत होतों. तोंच एक भली मोठी काळी धिप्पाड व्यक्ति माझ्यासमोर आली, व माझ्या पायाला धरून कॉटच्या बाहेर ओढलें; आणि मला घेऊन जाऊं लागली. इतक्यांत दुसरा एक त्याहून भिन्न परंतु भव्य ( तेजस्वी ) मनुष्य आला आणि त्यानें मला काळ्या व्यक्तीच्या हातून सोडविलें. दोघांची झटापट सुरू झाली. मी बाबांना हांक मारली. त्याक्षणींच माझे बाबा, जसे मी प्रतिमेंत पाहात असें तसेच प्रकट झाले. सुगंध सुटला, सबजाचा वास दरवळूं लागला. " हे सद्गुरु भक्त-वत्सला, तुझी लीला अगाध आहे. " सांई माऊली अवतीर्ण होतांच ती काळी व्यक्ति एका क्षणांत नाहींशी झाली. मी घाबरून जागा झालों तों तीन वाजले. इकडे माझा ताप उतरण्यास सुरवात झाली. ह्या आजारीपणांत आमचे पूज्य वडील माझ्याजवळ होतेच आणि आई कोंकणांत गांवीं एकटींच होती. ती सुद्धां रात्रंदिवस मला बरें वाटावें म्हणून बाबांची प्रार्थना करीत असे. एके दिवशीं रात्रीं आमच्या आईच्या स्वप्नांत श्रीबाबांनीं सांगितलें कीं, " घाबरूं नकोस, तुझ्या मुलाला रजा देववून घरीं आणतों. " या सांईच्या केवळ आशीर्वादानेंच मला आठ-दहा दिवसांत रजा मिळाली. आणि मी गांवीं गेलों. तीन महिन्यांनीं परत मुंबईस आलों. पुढें एक महिन्या-नंतर नाशिकला ट्रेनिंगसाठीं न पाठवितां मला कायम केलें.

---

आमचे एक स्नेही आबा सावंत यांच्या घरीं बाबांची एक तसबीर आहे. कधींकाळीं ते पूजा करीत असतात. त्यांची पत्नी कोंकणांतून पहिल्या-नेंच मुंबईस आली आणि ती तसबीर पाहून " ह्या म्हाताऱ्या मुसलमानाची

तसबीर आमच्या घरांत कशाला ? " असा प्रश्न विचारला. रा. आबा यांनीं आपल्यापरीनें श्री समर्थ बाबांची महति व महिमा सांगितला. पुढें कांहीं महिन्यांनीं त्यांनीं एक नवीन लुगडें विकत आणलें आणि आपल्या पत्नीला म्हणाले कीं, आज बाबांनीं पैसे दिले म्हणून हें लुगडें आणलें आहे. पण त्यांच्या पत्नीचा बाबांवर मुळींच विश्वास नव्हता. ती म्हणाली, " आपण आपल्या स्वकष्टार्जित पैशानें जर तें आणलें, तर तें बाबांनीं दिलें असें कसें म्हणतां येईल ? " ही वेळ संध्याकाळची होती. लुगडें पेटीवर ठेविलें होतें. रात्रीं जेवण झालें आणि लुगडें कसें काय आहे, रंग पक्का कीं कच्चा आहे, सूत बारीक कीं जाडें आहे म्हणून पाहाण्यासाठीं जों तिनें हात घातला तोंच, हातांत राख आली. सगळें लुगडें जळून राख होऊन जशीच्या तशी फक्त घडी राहिली. तिला फार वाईट वाटलें आणि प्रार्थना केली कीं, जर उद्यां पुन्हां माझें लुगडें मिळालें तर माझ्या गैरविश्वासामुळेंच मला देवानें शिक्षा दिली असें मी समजेन.दुसऱ्या दिवशीं रा.आबा यांस एका जुन्या कामाबद्दल दहा रुपये एका माणसानें आणून दिले. हे पैसे मिळण्यासारखे नव्हतेच आणि म्हणून त्यांना फार आनंद झाला. त्यांनीं आपल्या पत्नीला दुसरें एक नवें लुगडें आणलें. झालें. नवें लुगडें मिळतांक्षणींच त्यांच्या पत्नीचा बाबांवर पूर्ण विश्वास बसला, आणि त्या वेळेपासून बाबांची सेवा त्यांच्या घरांत सुरू झाली.

आम्हीं आमच्या ऑफिसच्यावर ( पोलीस स्टेशनवर ) राहातों. एकदां मी ऑफिसमध्यें काम करीत असतांना, जिन्यावर कोणी तरी पडल्याचा भास झाला, आणि वाटलें कीं, आमचा मुलगा (त्या वेळीं तीन वर्षांचा होता) पडला. मी ताबडतोब ऑफिसमधून जिन्याजवळ आलों तों ( मुलगा ) जिन्याच्या वरच्या पायरीवर खेळत होता. त्याला वर आंत जावयास सांगणार तोंच तो खालच्या पायरीवर घसरला आणि तेथून अकराव्या दगडी पायरीवर पडणार

इतक्यांत मी हात पुढें केल्यामुळें तो अलग माझ्या हातावर पडला. ईश्वर कृपेनें त्याला कांहींच लागलें नाहीं.

---

प्रत्येक पुण्य तिथीला मी कुटुंबासह शिर्डीस जात असतोंच. १९२८ सालीं आमची मंडळी गांवीं असल्यामुळें मी एकटाच शिर्डीस गेलों. गांवीं जाण्यापूर्वीं आमची पत्नी म्हणत होतीं कीं, दसरा झाल्यावर गांवीं जाईन. हेतु हा कीं, शिर्डीला जाणें होईल. पण प्रकृति अगदींच नादुरुस्त असल्यामुळें तिला दसऱ्या पूर्वींच गावीं पाठविलें. दसऱ्याच्या दिवशींच रात्रौ श्रीसद्गुरु बाबांनीं आमच्या कुटुंबाच्या स्वप्नांत येऊन भेट दिली. आणि त्याबरोबरच शिर्डीचा हुबेहुब देखावाही दिसला. श्रीबाबांच्या दर्शनाला जाण्याची उत्सुकता अनिवार झाली कीं, बाबांनीं त्याला आपल्या दर्शनास आणलेंच असे किती तरी अनुभव बाबांच्या भक्तगणांत आहेत.

---

गेल्या दसऱ्याचीच गोष्ट. आमच्याबरोबर दुसरी कांहीं मंडळी शिरडीला येणार होती. या मंडळींपैकीं कोणीही पूर्वीं शिर्डीला गेलेला नव्हता. म्हणून त्यांना बोरीबंदर स्टेशनवर भेटावयाला सांगितलें होतें. आम्हीं (मुलांमाणसांसह ) वेळींच स्टेशनवर पोहोंचलों. आमच्या तिकीटा काढल्या आणि मुलांना गाडींत व्यवस्थेशीर बसविलें. मी ठरविलेल्या जागीं येणारी मंडळी भेटलीं नाहींत म्हणून त्यांना स्टेशनवर शोधीत राहिलों. मंडळी दिसली. त्यांनीं तिकिटाही काढल्या नव्हत्या. घाई करून ओळखीनें तिकिटा मिळविल्या. त्या वेळीं फक्त सात मिनिटें राहिलीं होतीं. थर्ड क्लासच्या दरवाज्याजवळ आलों, पण तिकीटकलेक्टर आंत सोडीना. तेथून पळ काढीत स्टेशनच्या हॉलकडील दरवाज्यानें आंत शिरण्याचा प्रयत्न केला; परंतु तेथेंही तिकीट–कलेक्टर आंत सोडीना. गाडी सुटावयाला तीन मिनिटें राहिलीं होती. त्यानें फक्त मला आंत सोडलें होतें. मंडळी निराश झाली. मागाहून दुसरी गाडी आहे हें आम्हांला माहीत नव्हतें. आमच्यापैकीं कोणी एक निराश होऊन "बाबांची इच्छा" असें म्हणाला. इतक्यांत एक प्यासेंजर तेथें आला.

त्यानेंही स्वतःसाठीं विनवणी केली; परंतु तिकीटकलेक्टर कांहीं केल्या ऐकेना. तेव्हां तो तिकीटकलेक्टरच्या हाताखालून प्लॅटफॉर्मकडे पळाला. तिकीट कलेक्टरही त्याच्या मागून धांवला. दरवाजा मोकळा झाला. आम्ही सर्व मंडळी स्वस्थपणें गाडींत बसलों. तोंच गाडी सुटली. ही बाबांची कृपा नाहीं काय? म्हणून देवावर जितका जास्त भरंवसा ठेवावा तितकाच तो आपली काळजी वाहतो. सद्गुरुमाउली तिच्या भक्तांत भेदाभेद मानीत नाहीं; पण विश्वास मात्र पाहिजे.

दुसरे अनुभव पुढें केंव्हां तरी कळवूं.

आपला नम्र,

**नागेश आत्माराम सावंत.**

## सूत्र ३६ अव्यावृत भजनात् ॥

**आर्या:**—संतत नामस्मरणीं, रत झाल्यानेंहि भक्ति लाभतसे ॥
तव भजनीं रति ऐशी, द्यावी **सांई** सख्या गुरो मजला ॥

**विवरण**:--भजन म्हणजे सेवा, असा अर्थ असून ती सेवा करण्याचे प्रकार अनेक आहेत. त्यांकीं कोणत्याही एक किंवा अनेक प्रकारें अखंड सेवा करीत राहिल्यानें सेव्याचें ध्यान सतत चालू राहून त्या ध्यानद्वारां त्याच्या अखंड संगाचाही लाभ होतो. अशा संगापासून सेव्याविषयीं मनांत असलेलें प्रेम ( भक्ति ) अधिकाधिक दृढ होत जाऊन त्याच्या नित्य प्राप्तीची इच्छा उत्पन्न होते. हेंच निःसीम प्रेम उत्तम भक्तीचें लक्षण होय. सेव्याच्या नित्य संगामुळें त्याच्या गुणांचें ज्ञानही सहज प्राप्त होतें. वास्तव विषयांचें चिंतन आणि तद्वारा प्राप्त होणारी विषयसंगलालसा ह्या दोहोंचा त्याग करून ( भ. गी. २-६२, ६३ ) त्यांच्याऐवजीं समस्त वेदगीत जो श्रीहरि ( भ. गी. १५-१५ ) त्याचें चिंतन होऊं लागलें, म्हणजे हेय असलेल्या विषयसंगलालसेच्या ठिकाणीं उपादेय असलेली हरिसंगलालसा आपोआपच येऊन बसेल. आणि अशा वैराग्यशील भक्ताला स्वस्वरूपप्राप्ति करून देणें, हें जें परमेश्वराचें कार्य आहे, तें तो नंतर योग्य प्रकारें करूनही टाकितो. साधकाला त्याची चिंता करण्याची जरूर नाहीं. नाथभागवतांत श्रीकृष्णोक्त, पंधरा मुक्तिसाधनें दोन ओव्यांमध्यें सांगितलीं असून त्या सकळ साधनांत **नामस्मरण** आणि **ध्यान** ह्यांनाच प्राधान्य दिलेलें आहे. त्या ओव्या अशा आहेतः —

वाचा नेमावी माझे नामें । मन नेमावें ध्यानसंभ्रमें ।
प्राण नेमावा प्राणायामें । इंद्रियेंदमनें नेमावीं ॥ १ ॥
बुद्धि नेमावी आत्मविवेकें । जीव नेमावा परमात्मसुखें ।
इतुकेनि तूं अवश्यकें । होसी कौतुकें मद्रूप ॥ २ ॥

श्री ज्ञानेश्वरांनीं एके ठिकाणीं " **परी ह्या मनाचें येतुलें निकें। कीं तें देखिलिया गोडाशीं लाके ॥** " असें म्हटलें आहे; आणि त्याचा अनुभव सर्वत्रांना नित्य येत असतो. एक दिवस नाटक पाहिलें कीं, दुसरे दिवशीं तें पाहाण्याची इच्छा तयारच असते. ह्यास्तव मनाला एकदा भजनसुखाची लालसा उत्पन्न झाली, म्हणजे तें बहुधा दुसऱ्या विषयाकडे स्वतः होऊन जातच नाहीं.

## सूत्र ३७ लोकेऽपि भगवद्गुणश्रवणकीर्तनात् ॥

**आर्या:—**एकाकी नसतांना, ईशगुणश्रवणकीर्तनीं रमणें।
ऐशी कालक्रमणा व्हावी इतुका प्रसाद दे **सांई** ॥

**विवरण:—**भगवद्भक्त एकाकी असतांना कोणत्या साधनांचा आश्रय करितात, तें मागील दोन सूत्रांत सांगून आतां ह्या सूत्रांत ते एकत्र मिळाले असतां फक्त भगद्गुणश्रवणकीर्तनांत रंगून जातात, असें सांगितलें आहे. ह्याच साधनाचें वर्णन श्रीकृष्णांनीं ( भ. गी. ९--१३, १४, ) भगवद्गीतेंतही केलेलें आहे. श्री तुकाराम महाराजांनीं तर भगवद्गुणकीर्तनाचा क्रम अव्याहत सुरू ठेविला होता, आणि तेणेंकरून त्यांनीं लाखों भक्तजनांना भगवद्गुणश्रवणाचा लाभ करून दिला. " **आपण तरून दुसऱ्यातें तारी** " अशा अधिकाराचे ते होते. म्हणूनच त्यांचा अनेकदां छळही झाला, कारण " **आपण तरून दुसऱ्याशीं मारी** " अशालाच ह्या जगीं मान्यता मिळते असें श्री रामचंद्रांचें म्हणणें आहे, आणि तें आम्हीं प्रथम सूत्राच्या विवरणांत दिलेंही आहे.

## सूत्र ३८ मुख्यतस्तु महत्कृपयैव भगवत्कृपालेशाद्वा ॥

**आर्या:—**संतकृपें मुख्यत्वें, अथवा ईशाचिया कृपालेशें।
लाभे भगवद्भक्ती, हा अनुभव **सांईनें** मला दिधला ॥